प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

पुणे | मंगळवार । २८ जुलै २०२० ।

## ‘एमएमएफ’चा देशभरात मदतीचा हात

**पुणे :** कोरोना महामारी, निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा यामुळे देशाच्या विविध भागाचे, तसेच तेथील नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या संकटकाळात फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनने (एमएमएफ) संपूर्ण भारतभर मदतीचा हात दिला आहे. विविध स्तरांतील वंचित घटकांना, तसेच कोरोनायोद्ध्यांना पाठबळ देण्याचे काम फाउंडेशनने केले. एमएमएफचा २६ वा वर्धापनदिवस (दि. २६ जुलै) नुकताच झाला. या निमित्ताने व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी फाउंडेशनच्या कार्याबद्दल माहिती दिली. फाउंडेशनशी जोडल्या गेलेल्या सहकाऱ्यांकडून, कॉर्पोरेट दात्यांकडून, स्वयंसेवक व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यामुळे या संकटांचा सामना करणे शक्य झाले. मुकुल माधव फाउंडेशनने या संकटकाळात दिलेल्या मदतीमुळे देशभरातील विविध समुदायांना त्याची भरीव मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.